**क्रमांक : २९**

# महाराष्ट्र विधानपरिषद

## पत्रक भाग-दोन

**शुक्रवार, दिनांक १७ मे, २०१९/वैशाख २७, १९४१ (शके)**

संदर्भ:- पत्रक भाग क्रमांक २३ दिनांकित ११ मार्च, २०१९

**४५.** निदेशानुसार सर्व सन्माननीय सदस्यांना कळविण्यात येते की, लोकसभेच्या मार्च-एप्रिल, २०१९ मधील सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने भारत निवडणूक आयोगाने लागू केलेली आचारसंहिता विचारात घेऊन, मा.पीठासीन अधिकारी यांच्या निदेशानुसार सर्व सन्माननीय सदस्यांना दिनांक १९ मार्च, २०१९ ते निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंतच्या कालावधीत राज्यांतर्गत व राज्याबाहेरील प्रवासाकरिता रेल्वे कुपन पुस्तकांचा वापर, राज्य मार्ग परिवहन वा अन्य परिवहन सेवांद्वारे मोफत प्रवास व महाराष्ट्र विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते अधिनियम, १९५६ च्या कलम ५ (१-अ) नुसार विमान प्रवास या सुविधा अनुज्ञेय राहणार नाहीत, असे संदर्भाधीन पत्रक भाग-२ द्वारे कळविण्यात आले होते.

राज्यातील मतदानाची प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. त्यामुळे, भारत निवडणूक आयोगाशी केलेल्या पत्रव्यवहारानुसार व त्यानुषंगाने मा.पीठासीन अधिकाऱ्यांच्या निदेशानुसार आता यापुढे सन्माननीय सदस्यांना विधान भवन, मुंबई येथे विधानमंडळ समित्यांच्या होणाऱ्या बैठकांना उपस्थित राहण्याकरिता उक्त सुविधा अनुज्ञेय राहतील.

विधान भवन,
मुंबई,
दिनांक : १७ मे, २०१९

**जितेंद्र भोळे,**
सचिव (का.)
महाराष्ट्र विधानपरिषद

प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :-

(१) महाराष्ट्र विधानपरिषदेचे सर्व सन्माननीय सदस्य
(२) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व सर्व कक्ष
(३) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये